*कथा क्रमांक ११*

# तुझे आहे तुजपाशी

# भाग पहिला- १

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि घरात कोणी आहे का तिने लगेच  याचा कानोसा घेतला. अद्याप तरी शांतता होती म्हणजे दोन्ही कार्टी अजून घरी आली नव्हती. नवराहि कुठे उलथला होता देवाला माहिती.
सुलेखाने एक नि:श्वास सोडला. संध्याकाळी घरी आल्यावर आणि सगळे घरात परत येई हा जो काही अर्धा-पाऊण तास मिळेल तो तिचा स्वत:चा असायचा. तिने फेसबुक उघडले. भारतातल्या मित्र-मैत्रिणींचे अपडेट्स वाचत होती. अचानक नवीन मेसेज  आलेला दिसला. पहिले तर मेसेज  मनाली चा होता. भारतात कधी येणार विचारत होती नाही किंबहुना ऑर्डर दिली होती. सुलेखा ने ताबडतोब whatsapp चेक केले तर तिच्या खास मैत्रिणींच्या ग्रुप वर ढीगभर मेसेज आले होते. वाचल्यावर कळले कि तिचा भारतातला ग्रुप स्पेन ची ट्रीप काढतोय आणि सगळेजण जातायत, ती सोडून सगळ्यांनी हो सुद्धा  सांगितलय.
अमेरिकेत राहून छोटे मोठे समारंभ चुकतात आणि त्याची सवयहि होते. पण हि ट्रीप तिला चुकवायची नव्हती. तिला अचानक 'झिन्द्गी ना मिलेगी दोबारा' किंवा  तत्सम श्रीमंत माणसे आणि त्याचे फालतू प्रॉब्लेम  असलेले सिनेमे आठवले. आणि तशीच मजा येईल असे वाटले त्यामुळे नवरा, पोरे, डोक्यावर असलेली कामे आणि मुख्य म्हणजे भारतात जायचा खर्च याचा कसलाही विचार न करता तिने, "I  am in' असा रिप्लाय केला.
आता तिला दुसरे काही सुचत नव्हते. तिला सगळे जुने ट्रेक, सहली आणि सगळी धम्माल आठवायला लागली. या तरीप मधे तिचे जुने शत्रू पण येणार होते आणि ती तिच्या अमेरिकेची, श्रीमंतीची, तिच्या मोठ्या गाड्यांची शेखी मिरवणार होती  पण तिला कुठे माहित होते कि तिची हि idea तिला सॉलिड महागात पडणार आहे.
सुलेखा ला एक major महान किस्सा आठवला जेव्हा तिने तिच्या 'दिव्य दृष्टीने' कामशेत  हूनच सिंहगड दाखवला होता आणि पोरांनी तिची solid खेचली होती.
किंवा जेव्हा बापट ची सायकल विकून त्या पैशांनी सगळ्यांनी ट्रीप काढली होती
आता तिने चंग बांधला कि ते काही नाही तरीप ला जायच्या आधी वजन कमी करायचेच. ताबडतोब तिने इंटरनेट वर महागातल्या महाग जिम चा पत्ता शोधला. ताबडतोब तिने इंटरनेट वर महागातल्या महाग जिम चा पत्ता शोधला. तसेच ताबडतोब तिने Diet Food कुठून ऑर्डर करता येतील याची माहिती  काढली
तिकडे भारतात पण सगळ्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. धवल, निमिषा , किरण, कौस्तुभ सगळेच जण तयारीला लागले होते

सुलेखा विचार करू लागली की स्पेनला ट्रीप काढण्याची आयडिया कोणाची असेल ? ते पाहण्यासाठी तिने नेटवर तपास केला. तिच्या लक्षात आले की त्या देशात ट्रेकिंग करिता खूप छान स्पॉटस सर्वत्र विखुरलेले आहेत. आणि तिच्या ग्रुपला तर ट्रेकिंगचीच आवड आहे. नंतर तिच्या मनात आले की ही ट्रीप यांनी दहा दिवसांची ठरवली आहे खरी पण सगळ्यांनीच इतकी मोठी रजा कशी काय मिळवली असेल ? की नेहेमीप्रमाणे काहीजण ऐन वेळेला काहीतरी सबबी सांगून काढता पाय घेणार आहेत ? तिला आठवले की तिने सिंहगड दाखविताना केलेल्या बनवाबनवीनंतर धवल, किरण, कौस्तुभ यांनी कात्रजच्या घाटातून सिंहगडला जाण्याची ट्रीप ठरवली तेव्हा सुरुवातीला सगळे २० जण तयार झाले पण शेवटी केवळ ५ हीच संख्या उरली. अगोदर मारलेल्या थापांमुळे त्या ट्रीपला तिला सक्तीनेच जावे लागले होते. दुपारी एसटीतून कात्रजच्या घाटात उतरताना माहित नव्हते की तो ट्रेक ४० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा आहे व त्यात अनेक डोंगर चढावे व उतरावे लागणार आहेत. कौस्तुभला ट्रेकिंगचा सराव होता. तो हिमालयातदेखील ट्रेकिंग करून आलेला होता. नंतर तर त्याने हिमालयातील काही शिखरे सरही केली. म्हणूनच त्या कात्रज घाट ते सिंहगड ट्रीपमध्ये तो सुलेखाच्या ग्रुपचा गाईड होता. तो डिसेंबरचा महिना होता तरी रात्र पडेपर्यंत चढाव चढताना घाम फुटला होता. पण रात्री तर एका सपाट खडकावरच मुक्काम करावा लागला. तेव्हा जबरदस्त थंडीतही कौस्तुभने शेकोटी पेटवू दिली नव्हती व त्याचे कारण असे सांगितले की ती लांबून पाहिली तर दरोडेखोर येऊ शकतात. त्या खडकावरून दूरवर पुण्यातले दिवे काजव्यांच्या थव्यासारखे दिसत होते. मनात येत होते की सगळे घरात मस्त दुलईत गुरगुटून झोपले असताना आपण कोठे मुर्खासारखे येथे थंडीत कुडकुडतो आहोत ? नंतर त्या ट्रेकवर इतके दमायला झाले की परतल्यावर तीन दिवस नीट चालता येत नव्हते की सायकल चालवता येत नव्हती. सुलेखाच्या मनात पाल चुकचुकली की आता येतो येतो म्हणणारी ही बरीच मंडळी तेव्हासारखीच नंतर गायब तर होणार नाहीत ना ? या सगळ्या विचारात ती बुडून गेली. दारावर बेल वाजलेली तिला बराच वेळ कळलीच नाही. तिसऱ्यांदा बेल वाजल्यावर दचकून ती त्या तंद्रीतून भानावर आली. पवन आणि नेहा आपली दफ्तरे टेबलवर फेकताना ओरडले, “ काय आई झोप लागली होती का ? कितीवेळा बेल वाजवली आम्ही, लवकर काहीतरी खायला दे.” सुलेखाच्या मनात आले अरे बापरे मी गरम ताजे तर काही बनवलेच नाही. ही दोघे खाण्याच्या बाबतीत एकदम शौकीन आणि चोखंदळ आहेत. काय करावे बरे ? तेवढ्यात तिला आठवले की आज येताना तिने नुडल्सचे पाकीट आणले आहे. त्यात रेडीमेड मसालापण आहे. शिवाय त्यात थोडे मटारचे दाणे, टमाटा टाकला की झाले ! ती दोघे डायनिंग टेबलवर येण्याच्या आत त्यांच्या गरमागरम डीशेस तयार होत्या. त्या पाहून दोघेही खुश झाली. त्यांना पाहताना तिला जाणवले की आपण स्पेनला जाण्याचा मनसुबा तर करतो आहोत पण यांची काळजी कोण घेणार ? सगळे पाश विसरून थोडे दिवस का होईना पण जाणे शक्य आहे का? आणि योग्यदेखील आहे का ? नुसता विषय काढला तरी ही दोघे आणि नवरा घर डोक्यावर घेतील. शिवाय नोकरीत बॉस कुठला एवढी रजा देणार आहे ? गेल्या अर्ध्या तासात भूतकाळात विहार करून आलेले तिचे मन एका क्षणात जमिनीवर आले आणि सर्व जबाबदाऱ्यान्च्या ओझ्याखाली दडपून गेले.

मुलांची खाणी आवरेपर्यंत सुलेखाने एक छानसा चहा बनवला. गरम चहाचे घुटके घेत ती तिच्या नेहमीच्या झुलत्या खुर्चीवर बसली. वाफाळत्या चहाच्या मगला दोन्ही हातांनी धरून त्या चहाच्या वाफेची उठणारी आवर्तने पहात ती तिच्या विचारात गुंगून गेली. इतक्यात पवन ओरडला, " मम्मा, बाबांचा टेक्स्ट मेसेज आहे आपल्या फॅमिली whatsapp वर. त्यांना आज मीटिंग आहे त्यांच्या कस्टमरबरोबर. घरी यायला उशीर होईल.”

सुलेखाने एक दीर्घ निःश्वास टाकला आणि स्वतःशीच म्हणाली, ‘ तो येतो तरी कधी वेळेवर? रोज काही ना काही तरी कारण असते घरी उशिरा यायला त्याचे. आजकाल त्याच्या प्राथमिकताच बदलल्या आहेत. आधी ऑफीसचे काम मग मुलं, नंतर त्याचे मित्रमंडळ आणि सर्वात शेवटी, जर वेळ उरला तर, मग बायको! अशाने घरी संवाद व्हायचा तरी कसा आणि आपल्या मॅरीड लाइफला अशावेळी अर्थ तरी काय उरतो?

मुलांनी खाणे संपवून आपापल्या होमवर्कला सुरुवात केलेली तिने आपल्या जागेवरूनच पाहिले. आज संध्याकाळी स्वयंपाक फारसा करायचा नव्हताच. होत्या त्या गोष्टी गरम केल्या तरी चालणार होते. तिने खुर्चीवर पाय लांबवले, डोळे मिटले आणि आपल्या विचारांच्या गर्तेत स्वतःला झोकून दिले. अभयशी लग्न केले ते बरोबर की चूक? अमेरिकेत स्थायिक व्हायचे ठरवले त्याचं काय? आणि मग मुले? त्या अनुभवास मोल नाही हे खरं पण ती पण एक बेडीच ना बाईच्या पायातली. लग्नाआधीचा अभय पण थोडा असाच होता - आत्मकेंद्रित, स्वाभिमानी, धडाडीचा. एखादी गोष्ट हाती घेतली की ती तडीस नेल्याशिवाय सोडायचा नाही. सुलेखाची भेट झाल्याच्या पहिल्या दिवसापासून त्याने ठरवून तिला दिपवून टाकले होते. तिचा लग्नासाठी होकार आल्यानंतर सुद्धा अभयचे आणि तिचे courting एका तऱ्हेने चालू होते. एका जिवंत, रसरशीत आणि कमालीच्या intense अनुभवातून ती तेव्हा गेली होती. मग आत्ताच आपल्या आयुष्यात हा नीरसपणा का? की हा पण मिड-लाइफ क्राइसिस म्हणायचा?

खरं तर अभयची आणि तिची ओळख कौस्तुभनेच करून दिली होती. त्यांच्या त्या सिंहगड ट्रेक नंतर. पण त्या ट्रेकमधे शेकोटीशिवाय काढलेली ती रात्र सुलेखा कधीच विसरली नव्हती. पहाटेची थंडी वाढू लागली तशी तिची जणु थंडीने दातखीळच बसली. पूर्ण शरीर थंडीने थडथड कापत होते. कौस्तुभला ते जाणवले असावे. हळूच तो तिच्याकडे सरकला. तिच्या स्लीपिंग बॅगच्या बाजूला आपली बॅग सरकवली आणि आपल्या मजबूत हातांनी तिच्या शरीरावर गरम स्पर्शाचा थर बनवला. तिला फक्त जाणवला तो आश्वासक स्पर्श. त्यात पुरुषपणाचा, नर-मादीचा, सेक्सचा लवलेशही नव्हता. होता तो एक आदिम उबदार अनुभव. नंतर कौस्तुभने कधीच त्या विषयावर बोलणे काढले नाही. तिचे आणि अभयचे लग्न ठरल्यावर तर तो त्यांच्यापासून थोडासा वेगळाच झाला. मग तो आश्वासक स्पर्श अभयकडून का कधीच नाही मिळाला? तेथे फक्त शारीरिक देवाणघेवाणच का होती? की ही मानसिक गुंतवणूक करायला आपण दोघेही कमी पडलो? मग हे आपल्या लग्नाचे failureच म्हणायचे का?

आत्ता सुद्धा स्पेनला जाण्यामागे कौस्तुभची भेट हा खरा हेतू आहे की आपल्या एकसुरी आयुष्यापासून काही दिवस तरी सुटका मिळवायची हा?

पण मग अभय तसा काही अगदीच वाईट नाही. मानसिक, शारीरिक आणि आर्थिक गरजा पुऱ्या होतात या सहवासात. नोकरी दोघांची उत्तम चालली आहे. पैसा, समृद्धी भरपूर आहे. मित्रमंडळी, जिवलग आहेत. सोन्यासारखी दोन मुलं आहेत. मग what is missing?

विचारांच्या तंद्रीत सुलेखा किती वेळ बुडून गेली होती ते तिलाच कळले नाही. कौस्तुभ येणार नसेल तर स्पेनला जाणे कितपत फायदेशीर ठरेल? आणि तो आला नाही तर मग आपण आपल्या बाकीच्या मित्रांशी हा अनुभव तेवढाच एंजॉय करू शकू का? To go or not to go?

तिची रॉकिंग चेअर या 'गो- नो गो' च्या तालावर झुलत होती, इतक्यात गराजचे दार वाजले आणि घराचे दार उघडून हलक्या पावलाने अभय आत आला.

११_४

“सॉरी डार्लिंग खूप उशीर  झाला. तुमचे जेवण झाले का?” अभयने हलकेच कपाळावर किस केले आणि तो झोपायला निघून गेला. हे रोजचेच होते. ह्यावरून तिचा आणि अभय चा नेहमी वाद होत असे पण काही उपयोग नव्हता.पवन आणि नेहा भूक भूक करत आल्यावर त्या तिघांनी जेऊन घेतले.

‘What is missing?’ चा किडा काही तिच्या डोक्यातून जात नव्हता.गाडी,घर,पैसा दोन छान मुले सगळे काही होते पण चार्म राहिला नव्हता.अमेरिकेत नवीन आल्यावर तिला खूप आवडले होते. इथले रस्ते,इथली स्वच्छता,मुक्त  स्वच्छंदी  आयुष्य सर्व काही  तिने मनसोक्त उपभोगले. इथे ही  त्यांचा छानसा  ग्रुप होता. मग इथे काय कमी होते? दर दोन वर्षांनी ते भारतात सर्वांना भेटून यायचे. दोन्ही मुले हुशार होती.

तेवढ्यात निमिशाचा  मेसेज  दिसला  “ स्काईप वर येते का ? जरा बोलू” सुलेखाने स्काईप लावताच निमिशाला किती बोलू  अन किती नको असे झाले.

“ लेखा तू येणार आहेस हे नक्की ना ?  नो एक्स्क्यूज हं ! ”

“ कोण कोण येणार हे तर सांग,  मला खूप गोष्टी अरेंज करायला लागणार आहेत ग !”

“धवल,मी, किरण,राहुल, कौस्तुभ आणि मनाली    हे तर नक्की येणार आहेत.  बघू तन्वी, श्वेता येतात का ते ? लेखा तू भेटली नाहीस बरेच  वर्षात  म्हणून  सर्वांना उत्सुकता  आहे बर का. आणि आपण आत्ता नाही ट्रेकला जाणार तर केव्हा चाळीशी झाल्यावर का ?”

“सोपे आहे का मुलांना सोडून येणे ? त्यांची जबाबदारी कोणावर टाकू ?”

“अभय आहे की ,तो नाही का बघणार त्यांच्याकडे ? दहा दिवसांचाच तर  प्रश्न आहे”

“ नक्की ट्राय करते बघ. मला पण भेटायचे आहे सर्वांना”

ग्रुप मधले सगळे भेटले असते, गप्पा झाल्या असत्या आणि ट्रेकिंग तर तिचा जीव की प्राण होते. ट्रेकिंग कारतांनाचा तो थरार, ते शूज , सर्वांनी पकडून ठेवलेली ती लाईफ लाईन, ते एकमेकांना ओरडून ok सांगणे , आणि डेसटीनेशनला पोहोचल्यावर होणारा तो अवर्णनिय आनंद हे सगळे तिला परत अनुभवायचं होतं. पण.......

हा पणच होता मध्ये. मुलांचे काय? अभयला  सांगायचे म्हणजे तिला भीती वाटत होती. त्याने  सुट्टी घेतली नसती आणि मुलांकडे बघायला कोणी नव्हते. बॉस ला थाप मारून ती रजा घेणार होती. इतके वर्षात ती कधी मुलांना सोडून गेली नव्हती ,या वेळेस तिची खूप इच्छा होती जायची.

तिने विषय काढताच अभयने तर एकदम झटकूनच टाकले, पण लीनाने तिचा प्रोब्लेम सोडविला. आठवड्यातले पाच दिवस ती मुलांना सांभाळणार होती. खरोखर लीना तिची अगदी खास मैत्रीण होती.

अभय तिच्यावर खूप रागावला होता. असा मूर्खपणा तिने करू नये असे तो सांगत होता. आणि मग तिच्या लक्षात आले की अभय आपला नवरा झाला पण आपला मित्र झाला नाही. आपल्याला जाण्यासाठी परवानगी मागावी लागते. आपली एवढी तीव्र इच्छा बघून त्याने आपल्याला सोल्युशन द्यावे , दुसरा काही पर्याय सांगावा असा विचार तो करूच शकत नाही. स्वतः पलीकडे जाऊन तो विचार करत नाही. आपल्याला व मुलांना पैसा पुरवला की  झाले एवढाच विचार तो करतो आणि हेच आपल्याला खटकते. आपण इथे सुखी आहोत नक्की पण आनंदी नाही हे पण तेवढेच खरे, आणि जो आपला एव्हढाही  विचार करत नाही त्याचे मन आपण का राखावे.

माझे तिकिटाचे पैसे कधी पाठवू ? असा  मेल तिने टाकला.

एकदा एखादी गोष्ट करायची ठरवावी आणि आपोआप संपूर्ण विश्वच जणू ती गोष्ट व्हावी म्हणून आपल्याला मदत करते असे सुलेखाचे होत गेले आणि काही न कळता ती माद्रिद एअरपोर्टवर पोचली देखील. भारतातील मंडळी अगोदरच तिची वाट पाहत होती. धवल, निमिषा , किरण, राहूल, कौस्तुभ आणि  मनाली सगळे तिला जवळ जवळ पाच वर्षांनी भेटत होते. बाप रे केवढा बदल? धवल चे केस सगळे गायब, तर किरणचे बरेचसे पांढरे. निमिषा पक्की काकूबाई, पण मनाली एकदम फॉर्ममध्ये होती कॉलेजमध्ये पोट्या असलेला राहूल एकदम डूड झाला होता. राहता राहिला कौस्तुभ, त्याला तर सुलेखा ओळखूच शकली नाही. भेटल्या भेटल्या त्यांच्या गप्पा मात्र अशा सुरु झाल्या कि काहीच बदलले नव्हते. सगळ्यांचे स्वभावही अगदी तसेच होते. एकमेकांची खेचणे, टोप्या घालणे अगदी तसेच सुरु होते. ह्या सगळ्यात सुलेखा अगदी रंगून गेली.

पहिल्याच संध्याकाळी खास spanish tapas चे जेवण झाल्यावर पारंपारिक फ्लामेंको नृत्य पाहायला सगळे गेले. गूगलवरून एक मस्त असा ट्रेकिंग स्पॉट शोधून काढला होता, तिकडे सकाळी प्रयाण झाले. साधारण दोन तास डोंगर चढून वरतीच पोचल्यावर तिकडेच तंबू टाकून दुसऱ्या दिवसापर्यंत ते राहणार होते. त्यानंतर मात्र सगळ्यांचा मूडनुसार पुढचा प्लान ठरवायचा असे ठरले होते. हसत खेळत हळू हळू सगळे डोंगरावर पोचले. वयाचा परिणाम मात्र चांगलाच जाणवत होता आणि इतकी वर्षे जिम ला न गेल्याचाही. रात्री शेकोटी करून गप्पा मारताना निमिषाने त्या सिंहगडाच्या ट्रेकची आठवण काढली. "तुला आठवते का सुलेखा, मी त्या दिवशी मी इतकी घाबरले होते रात्री. मी आधी बाहेरच्या बाजूला झोपले होते, पण नंतर कौस्तुभला सांगून तुझ्या शेजारी झोपायला आले. रात्री कोल्हेकुई ऐकू आली आणि घाबरून मी आपला तुझ्या अंगावर हात टाकला." सुलेखा हे ऐकून एकदम नि:शब्दच झाली. इथे ट्रीपला येताना ज्या प्रसंगाची आपण एवढी आठवण काढली तो असा होता? म्हणजे कौस्तुभ आणि आपल्यामध्ये असे काहीच झाले नव्हते?

रात्री तंबूमध्ये सुलेखाला झोपच लागेना. इथे येण्याचे ठरवताना जे जे विचार आले त्याची तिने उजळणी सुरु केली. आपले आयुष्य एकसुरी झाले आहे, त्यातील चार्म संपला आहे असे तिला वाटत होते. पण आत्ता ह्या सगळ्या मंडळींशी गप्पा मारताना नवीन सांगण्यासारखे असे कितीतरी विषय तिच्याकडे होते, हे तिचे तिलाच लक्षात आले. प्रत्येक सुरामाध्येही अनेक श्रुती दडलेल्या असतात,  त्याप्रमाणे एकसुरी वाटणार्या आयुष्यातही अनेक पैलू असतातच. जसा एखादा निष्णात गायक एकेक सूर घेऊन त्याची वाढ करून दाखवतो, त्याप्रमाणे आपल्या आयुष्यातल्या सुरांच्या ताना करणे आपल्याच हातात असते. वयानुसार, आयुष्यातल्या टप्प्यानुसार सूर बदलणारच. पण त्यात चार्म परत येत नाही म्हणून एक प्रकारे नवऱ्याला आणि मुलांना आपण जबाबदार ठरवतो, हे चुकीचेच आहे. नवऱ्याने केलेले स्पर्श हे आश्वासक नसून त्यात केवळ शारीरिक देवाण घेवाण होती असे ठरवताना, त्याने अनेक गोष्टींपासून नकळत आपल्याला प्रोटेक्ट केले होते हे आपण विसरतो. मगाशी मनाली म्हणाली कि पुरुषांना सगळ्या गोष्टी बोलून दाखवता येत नाहीत, किंबहूना अनेक गोष्टी ते मुद्दामून बोलत नाहीत, तेवाच सुलेखाच्या लक्षात आले की अशा कितीतरी गोष्टी असतात ज्यांसाठी आपण नवऱ्याला गृहीत धरून चालतो, आणि

तो ते बोलूनही दाखवत नाही. त्यातल्या अनेक गोष्टी तर अशा असतात ज्या त्याच्याही लक्षात आलेल्या नसतात. आपण मात्र स्वत: केलेली प्रत्येक गोष्ट जरी नवऱ्याला सांगत नसलो तरी स्वत:च्या मनाला सांगतच असतो.

तिच्या सगळ्या मित्र मैत्रिणींनी आपापले आयुष्य वेगळ्या वाटेने नेले होते आणि प्रत्येक जण वेगवेगळ्या गोष्टींसाठी धडपडत होता. दुक्ख, त्रास सर्वांनाच होते पण प्रत्येक जण कुठल्या न कुठल्या छोट्याश्या गोष्टीत आनंद घेत होता. मनाली फिटनेस फ्रीक होती, पण तिचा आनंद डाएटिंग केल्यानंतरही तिचा मुलगा जेव्हा रात्री तिला आइस क्रीम आणून देतो ते खाण्यातच होता. धवल खूप मोठा, श्रीमंत बिल्डर झाला होता, पण त्याचा आनंद हाच होता कि स्वत:चा धंदा असल्याने दुपारी तासभर झोप घेणे त्याला शक्य होते. आपणही आपला आनंद अशा छोट्या गोष्टींमध्ये शोधला तर एकेक एकेक आनंद दिसू लागतील असे सुलेखाच्या लक्षात आले आणि तिला तसे ते दिसूही लागले.

उत्साहाने ती सकाळी लवकर उठली आणि कॅम्पफायरवरच ब्रेकफास्ट करू लागली. येताना माद्रीदला त्यांनी सगळी खरेदी केली होती पण मग तिच्या लक्षात आले कि तिला स्वत:ला ओम्लेटवर चेडर चीज लागते ते मात्र नव्हते. पण मागून कौस्तुभ आला आणि त्याने त्याच्या bagमधून चेडर चीज काढून दिले. अभयने त्याला मेसेज करून त्याची आठवण करून दिली होती. आपल्याला स्पेन मध्येही हवे तसे आम्लेट मिळू शकते ह्या छोट्याशा आनंदानी ती सुखावून गेली आणि ह्यापुढे अशाच प्रत्येक छोट्या गोष्टीत आपला आनंद शोधावा असे तिने ठरवले. What is missing ह्या प्रश्नाचे उत्तर शेवटी तुझे आहे तुजपाशी हेच आहे.